राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव / सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यास मंजूरी देताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्र. याचिका-२०१८/प्र.क्र.२५३/नवि-१७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १९ सप्टेंबर, २०१९.

वाचा :- (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१७३/२०१० श्री.महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १०.०८.२०१६, ०८.०२.२०१८ व २५.०४.२०१९ रोजी दिलेले आदेश.
(२) केंद्र शासनाचा घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६.
(३) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र-२०१६/प्र.क्र.१२७(भाग-१)/नवि-१७, दि.०६.०३.२०१६.

प्रस्तावना :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१७३/२०१० श्री.महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १०.०८.२०१६, ०८.०२.२०१८ व २५.०४.२०१९ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव / सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यास मंजूरी देताना याचिकाकर्त्यांने मंडप बांधण्या / उभारण्यासंदर्भात केलेल्या सूचना, नवी मुंबई महानगरपालिकेने तयार केलेले सॉफ्टवेअर अन्य नागरी स्थानिक संस्थांनी वापरण्यासंदर्भात निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

उपरोक्त नमूद पार्श्वभूमी पहाता, राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव / सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यासंदर्भात शासन निर्णय, दि.०६.०३.२०१६ अन्वये नागरी स्थानिक संस्थांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनांव्यतिरिक्त सार्वजनिक उत्सव / सण / कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरता मंडप उभारण्यास मंजूरी देताना त्यांनी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अनुसरावी :-

अ) मंडप बांधण्याकरीता /उभारण्याकरीता अर्ज सादर करण्याची पध्दत:-

(i) सर्व सणांकरीता मंडप बांधण्याकरीता /उभारण्याकरीता अर्ज संबंधित सणाच्या ३० दिवसापूर्वी करावा. सणाच्या/समारंभाच्या १० दिवसापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(ii) सर्व नागरी स्थानिक संस्थांनी सणाच्या ४५ दिवसांपूर्वी २ स्थानिक वृत्तपत्रात या संदर्भात सार्वजनिक सूचना प्रसिध्दीस द्यावी.

(iii) सर्व नागरी स्थानिक संस्थांनी मंडप बांधण्याकरीता /उभारण्याकरीता दाखल करावयाच्या अर्जाबाबतची कार्यपध्दती त्यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी व ऑनलाईन प्रणालीवरच अर्ज सादर करण्यात येईल याची खात्री करावी.



Scanned with CamScanner

(iv) नागरी स्थानिक संस्थांनी प्राप्त सर्व परवानग्या यथोचित असल्याची खात्री पटल्यावर सणांच्या सात दिवस अगोदर मंडपास परवानगी द्यावी.

(v) सणाच्या/समारंभाच्या दिवसापूर्वीच्या ०७ दिवसात कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येवू नये.

(vi) नागरी स्थानिक संस्थांकडे मंडप बांधण्याकरीता /उभारण्याकरीता दाखल करण्यात आलेले अर्ज सर्व संबंधित प्राधिकरणांकडे पाठवावेत. सर्व संबंधित प्राधिकरणांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर ३ कार्यालयीन दिवसात कार्यवाही करुन त्यांचा अहवाल पदनिर्देशित अधिकाऱ्यास सादर करावा.

(vii) नागरी स्थानिक संस्थांनी शक्यतो "सिंगल,विंडो" प्रणालीचा वापर करावा.

(viii) ऑन लाईन प्रणालीवरील अर्जात खालीलं बाबींचा अंतर्भाव करावा:-

- अर्जदाराचा संपूर्ण पत्ता (पुराव्यासह), मोबाईल क्रमांक, आधार कार्ड क्रमांक, ई-मेल
- यापूर्वी अर्जदारविरुध्द तक्रार प्राप्त झाली असल्यास त्याचा तपशील
- अर्जदाराने लाऊड स्पिकरची परवानगी प्राप्त केली आहे का?
- आग प्रतिबंधक उपाययोजना निकषांची अंमलबजावणी करण्यात आली आहे का?
- यापूर्वी परवानगी प्राप्त केलेली असल्यास त्याचा तपशील
- बांधण्यात/उभारण्यात येणाऱ्या मंडपात येणाऱ्या संभवित लोकांना सामावण्याची क्षमता तसेच रस्ता / फूटपाथची रुंदी पुरेशी आहे का?
- नागरीकांना जाण्या-येण्यासाठी पुरेसा रस्ता / फूटपाथ मोकळा आहे का?

ब) कागदपत्रांची पडताळणी:-

(i) अर्जदाराने अर्जासोबत आवश्यक कागदपत्रं दाखल केली आहेत किंवा नाही याची खातरजमा संबंधित नागरी स्थानिक संस्थांनी करावी व आवश्यकता भासल्यास अर्जदाराशी संपर्क साधून कागदपत्र सादर करण्याबाबत कळवावे.

(ii) कागदपत्रांची पडताळणी केल्यावर नागरी स्थानिक संस्थांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ८५/२००७ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १०.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद ९४ (xii) नुसार अर्जदाराकडून हमीपत्र घ्यावे.

क) कागदपत्रांची पडताळणी केल्यावर परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दती:-

(i) अर्जासोबतची कागदपत्रे, संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या परवानग्या यांची छाननी करुन तसेच प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, परवानगी देण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे / नियम यामधील तरतुदी व मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा सर्वकष विचार करुन पदनिर्देशित अधिकाऱ्याने अंतिम परवानगी द्यावी.

(ii) ना-हरकत प्रमाणपत्रे देणाऱ्या विभागांपैकी एका विभागाने जरी ना-हरकत प्रमाणपत्र दिले नाही, तरी पदनिर्देशित अधिकाऱ्याने अंतिम परवानगी देवू नये.

ड) तात्पुरते बांधकाम / मंडप निष्कासित करण्याबाबत करण्याबाबतची कार्यवाही:-

तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या समितीने त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या हद्दीत उभारण्यात आलेल्या मंडपांची सणांच्यापूर्वी तपासणी करावी. सदर मंडप अस्तित्वात असलेले कायदे / नियम यामधील तरतुदी



Scanned with CamScanner

व मा.न्यायालयाने दिनांक १०.०८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशाचा भंग करीत असल्यास, असे मंडप निष्कासित करण्याची कार्यवाही करावी. सदर कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाण्याने पुरेसा बंदोबस्त पुरवून कायदा व सुव्यवस्था राखावी. नागरी स्थानिक संस्थांनी असे मंडप कोणत्याही परिस्थितीत नियमित करु नयेत. तसेच संबंधित मंडळ / अर्जदार / संस्था यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्याची आवश्यक कार्यवाही नागरी स्थानिक संस्थांनी करावी.

इ) नियमभंग करणाऱ्यांवर करावयाची कार्यवाही:-

मंडपाची उभारणी करताना रस्ता / फुटपाथ / कुठलीही सार्वजनिक मालमत्ता याचे नुकसान होणार नाही तसेच नागरी स्थानिक संस्थांनी घातलेल्या अटी व शर्तींचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. असे नुकसान झाल्यास नागरी स्थानिक संस्थांनी संबंधित मंडळ / अर्जदार / संस्थांवर अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

ई) निर्माल्यावर करावयाची कार्यवाही:-

उत्सवाच्या दरम्यान जमा होणाऱ्या निर्माल्यावर केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मध्ये नमूद तरतुदीनुसार संबंधित मंडळ / अर्जदार / संस्था यांनी कार्यवाही करावी.

उ) सण / कार्यक्रम संपल्यावर तात्काळ मंडप / तत्सम बांधकाम तात्काळ काढण्याची जबाबदारी संबंधित मंडळ / अर्जदार / संस्था यांची असेल. याकरीता कोणताही अतिरिक्त कालावधी नागरी स्थानिक संस्थांनी देवू नये.

२. सार्वजनिक उत्सवाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास परवानगी देण्याकरीता एक खिडकी योजना सुरु करण्यात यावी. सार्वजनिक उत्सवाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास ऑनलाईन परवानगी देण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने DSS World, पुणे या कंपनीकडून तयार केलेल्या सॉफ्टवेअरचा वापर सर्व नागरी स्थानिक संस्थांनी करावा, त्यानुसार कारवाई करताना तेथील स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल करण्यास वाव असेल.

३. सदर शासन परिपत्रक महसूल व वन विभागाच्या तसेच गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
७. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय



Scanned with CamScanner